Vol-13 Special Issue- 1.4 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# इयत्ता दहावी इतिहास पाठयपुस्तकातील विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वसुधैव कुटुंबकम भावनेचा विकास साधने

**डॉ. केदार वाल्मिक पुंजू**
नूतन विद्यालय, मुंबई

## प्रस्तावना

'वसुधैव कुटुंबकम' या महाउपनिषदातील संस्कृत वचनाचा अर्थ " संपूर्ण जग एक कुटुंब आहे" असा होतो. याचा शब्दशः अर्थ वसुधा म्हणजे पृथ्वी (Earth) एव-च (is) कुटुम्बकम् म्हणजे कुटुंब (Family) असा होतो. म्हणजेच धरती हेच कुटुंब आहे. या भावनेचा विकास व्यक्तींमध्ये करणे भारतातील प्राचीन शिकवणुकीमध्ये अनेक संदर्भामध्ये या वचनाचा उल्लेख दिसून येतो. पृथ्वीवरील सर्व सजीव-निर्जीव एकाच कुटुंबाचा भाग आहेत, त्यामुळे त्या सर्वांबरोबर प्रेमाने, एकजुटीने, सहिष्णुतेने वागण्याचा संदेश या वचनातून मिळतो. आपला किंवा परका अशी भावना ही संकुचितपणाचे लक्षण आहे. उदारपणाच्या भावनेमध्ये संपूर्ण जगच एक कुंटुंब आहे. त्यामुळे या भावनेची जोपासना होणे गरजेचे आहे.

**वसुधैव कुटुंबकम मूल्य रुजविण्याची गरज :-** आज भौतिक सुखाच्या मागे लागून होत असलेला मानवी मूल्यांचा -हास फक्त विकासावर लक्ष केंद्रीत करत असतांना, शाश्वत स्वरुपाच्या विकासाकडे होणारे दुर्लक्ष, तसेच जगावर असणारे युद्धाचे सकंट या सगळ्या जागतिक समस्यांचा विचार करता वसुधैव कुटुंबकम मूल्य समाजामध्ये रुजविणे गरजेचे आहे. तेही विद्यार्थी दशेपासूनच ते रुजविण्यात आले तर विद्यार्थ्यांचा उदार दृष्टीकोन तयार होऊन ते जबाबदार नागरिक म्हणून केवळ देशपातळीवरच्याच नाहीत तर, जागतिक पातळीवरच्याही समस्या हाताळतील आणि ते पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाने शक्य होईल.

**इयत्ता दहावीचे पाठ्यपुस्तक व वसुधैव कुटुंबकम् भावनेचा विकास :-** पाठ्यपुस्तकांचे शिक्षण प्रक्रियेतील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. पाठ्यपुस्तकांमधुन विद्यार्थ्यांवर विविध संस्कार घडत असतात. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील विविध अध्ययन घटकांचे व त्यांच्याशी संबंधित विविध अध्ययन-अध्यापनाच्या कृतींचे नियोजन केल्यास इच्छित उद्दिष्टे साध्य होऊ शकते. सन २०१८ च्या पाठयक्रमासाठी इयत्ता १० वीच्या वर्गासाठी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या इतिहास राज्यशास्त्र विषयाच्या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन अध्यापनातून वसुधैव कुटुंबकम भावनेचा विकास विद्यार्थ्यांमध्ये होऊ शकतो. या विकासाला अनुकूल ठरणाऱ्या सात घटकांचा समावेश या पाठ्यपुस्तकात आहे.

**इयत्ता दहावी पाठ्यपुस्तकातील घटक :-**

| | |
|---|---|
| १ | प्राचीन ते आधुनिक कालखडांतील इतिहासाचे चिकित्सक समालोचन |
| २ | उपयोजित इतिहास |
| 3 | प्रसारमाध्यमे आणि इतिहास |
| ४ | मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास |
| ५ | कला, क्रिडा व साहित्य क्षेत्त आणि इतिहास |

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

| | |
|---|---|
| ६ | पर्यटन आणि इतिहास |
| ७ | इतिहास व अन्य क्षेत्रे |

वरील सात घटकांचा समावेश पाठयपुस्तकाच्या ९ प्रकरणामध्ये करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या आधारे भारतीय इतिहासाच्या अध्यापनाबरोबरच जगतील पाश्चिमात्य देशातील इतिहासाला देखिल स्थान देण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन विशाल होईल व त्यांच्या मध्ये वसुदैव कुटुंबकम् भावना विकसित होण्यास मदत होईल .

## पाठयक्रमातील उपक्रमांचे नियोजन

| क्रमांक | उप्रकमाचे नाव |
|---|---|
| १ | आवडत्या विषयावर विस्तृत माहिती मिळवा<br>अ) पेन (लेखणी) या इतिहास<br>ब) मुद्रणकलेचा इतिहास<br>क) संगणकाचा इतिहास |
| २ | राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय इतिहासकारांची माहिती देणारे सचित्र हस्तलिखित तयार करणे व ती वर्गात सादर करणे |
| 3 | भारतातील विविध ऐतिहासिक विचारप्रवाहांची माहिती मिळविणे |
| ४ | भारताच्या नकाशा आराखड्यात विविध वारसास्थळे दाखविणे व त्यांची माहिती देणे |
| ५ | जगाच्या नकाशा आराखड्यात विविध जागतिक वारसास्थळे दाखविणे व त्यांची माहिती देणे |
| ६ | युनोस्कोने जाहिर केलेल्या भारतातील जागतिक वारसास्थळांची यादी करणे व ती माहिती वर्गात लावणे |
| ७ | ऐतिहासिक मालिकेचे परीक्षण करणे |
| ८ | भारूड किंवा पोआडा यासारख्या लोककला वर्गात साभिनय सादर करणे |
| ९ | आवडीचा खेळ तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंची माहिती मिळविणे व ती वर्गात सादर करणे |
| १० | राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रिडांपटुवरील पुस्तके / माहितीपट । चित्रपट यांची माहिती मिळविणे |
| ११ | ऐतिहासिक स्थळांच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपाययोजना सूचविणे |

## उपक्रमांची कार्यवाही :-

वर्षभरात राबविता येतील अशा उपक्रमांची यादी तयार करणे.

उपक्रमात सहभागी होऊ इच्छि-या विद्यार्थ्यांची यादी तयार करणे

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना उपक्रम राबविण्यासाठी एकत्रीत मार्गदर्शन करणे.

विद्यार्थ्यांना उपक्रम निवडीचे स्वातंत्र्य देणे.

आवडत्या उपक्रमानुसार विद्यार्थ्यांचे गट तयार करणे.

इयत्ता १० वी चे वर्ष लक्षात घेऊन त्यानुसार वेळापत्रक बनविणे.

विद्यार्थ्यांना येणाऱ्या विविध अडचणींविषयी मार्गदर्शन करणे.

उपक्रमांसाठी लागणाऱ्या ग्रंथालय, आंतरजाल, टी.व्ही. यासारख्या साधनांची उपलब्धता करून देणे-

उपक्रमांचे योग्य मूल्यमापन करणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## पाठ्यपुस्तकातील विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनात होणारे अपेक्षित बदल :-

**जागतिक शांतता आणि सलोखा निर्मितीचा दृष्टीकोन :-**जागतिक संघर्ष, दहशतवाद, युध्दे यासारख्या तणावाच्या काळात विद्यार्थ्यीमध्ये विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होईल.

### सांस्कृतिक देवाणघेवाण :-

विद्यार्थ्यांमध्ये, विविध संस्कृतींविषयी. आदराची भावना निर्माण होईल. त्यामुळे एकात्मतेला प्रोत्साहन मिळेल.

### सहकार्य आणि बंधुत्व भावना :-

या भावनेमुळे करोनासारख्या सकंटाच्या काळातही, देशाच्या सीमा ओलांडून एकमेकांना मदत करण्याची भावना निर्माण होईल.

### द्वेष आणि आपसातील भेदभावाचा अंत :-

जगाकडे एकाच कुटुंबाच्या भावनेतून पाहिल्यामुळे वर्णभेद, धर्मभेद कमी होऊन उदारपणाची भावना वाढेल.

### हवामान बदल व पर्यावरणीय संकटकाळी मदत :-

मानवाचा आणि पृथ्वीचा परस्परांशी सबंध आहे. त्यामुळे पृथ्वीच्या रक्षणासाठी शाश्वत विकासाची भावना विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल.

अशाप्रकारे वर्तनबदल विद्यार्थ्यांमध्ये होतील.

### सारांश

इयत्ता दहावीच्या इतिहास विषयाच्या अध्ययन - अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये वसुधैव कुटुंबकम भावना विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील उपक्रमांची योग्य आखणी करून त्यांची अंमलबजावणी केल्यास हे उद्दिष्ट साध्य होते.

### संदर्भ

राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020: शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

इतिहास राज्यशास्त्र पाठ्यपुस्तक (२०१८):

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

शिक्षण संक्रमण, (२०१०), राज्य अभ्यासक्रम आराखडा विशेषांक, पुणे (महाराष्ट्र)

भारतीय शिक्षण (मासिक): ऑक्टोंबर-नोव्हेंबर-2023 अंक महाराष्ट्र

भारतीय शिक्षण, कांदिवली (प), मुंबई

en.wikipedia.org

Worldwidejournal.com